# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई

जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रु.नं.१, २, ५ व ६ हजारीमल सोमानी मार्ग,
छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, मुंबई- ४०० ००१ ०२२-२२०५७४०९/२२०७२०९७/२२८२१८१० फॅकस ०२२ २२०१८५३९
E-mail : mah-sforum@nic.in Website:- www.grahak.maharashtra.gov.in


जा.क्र.राआ/महा./आस्था/शि.अ.ज.पदोन्नती /पसंतीक्रम/२०१७/३३२५ दि - २८ जून, २०१७

प्रती,

१. प्रबंधक (विधी), राज्य आयोग परिक्रमा खंडपीठ नागपूर /औरंगाबाद
२. सर्व प्रबंधक जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच

विषय :- शिरस्तेदार / अधिक्षक/जनसंपर्क अधिकारी (अराजपत्रित गट)
या पदावर पदोन्नतीचे पसंतीक्रम मागविणेबाबत

संदर्भ :- १.सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन राजपत्र दि. २८/०४/२०१५
२. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन राजपत्र दि.१६/०७/२०१५
३. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन राजपत्र दि. १५/०६/२०१५

उपरोक्त संदर्भाकिंत विषयाच्या अनुषंगाने कळविण्यांत येते या यंत्रणेतील खालील सहायक अधिक्षक यांचे नांव शिरस्तेदार / अधिक्षक/जनसंपर्क अधिकारी (अराजपत्रित गट ब) या पदाच्या पदोन्नतीच्या निवडसूचीत असून त्यांचेकडून वरील संदर्भ क्र.३ च्या नियम ) ५ ब १ प्रमाणे पदस्थापितीकरीता पसंतीक्रम घेऊन ७ दिवसाच्या आत या कार्यालयास सादर करावेत.

तसेच संदर्भ क्र.१ मधील नियम क्र.७ व संदर्भ क्र.३ मधील नियम क्र.६ मध्ये प्रकरण येत असल्यास त्या पृष्ठयर्थ आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सोबत जोडाव्या व आपले पदाचा पसंतीक्रम कळवावा. सोबत दिलेल्या विकल्प नमुन्यामध्ये माहिती सादर करावी. सोबत वरील संदर्भिय अधिसूचनेच्या प्रती पाठविणेत येत आहे. सदरचे पत्र www.grahak.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ही प्रसिध्द करणेत आहेत.

तरी आपल्या कार्यालयातील संबंधितास सदर पत्र व सोबत जोडलेल्या पत्राच्या प्रती हे तात्काळ देऊन त्यांची पोहोच घेणे व आपल्या कार्यालयातच जतन करुन ठेवणे. तसेच संबंधित पदोन्नत अधिका-याकडून पसंती क्रम प्राप्त झालेनंतर तात्काळ या कार्यालयास सादर करावा. सदर विकल्प दि. ०५/०७/२०१७ पूर्वी प्राप्त न झालेस हे कार्यालय वरील संदर्भिय अधिसूचनेनुसार पुढील कार्यवाही करेल. याची नोंद घ्यावी.

(कृ.मा.प)

निवडसूचीतील कर्मचा-यांची नांवे खालीलप्रमाणे

१) श्री.सुहास पांडुरंगराव कोटुरवार
२) श्रीमती अश्विनी अविनाथ जोशी
३) श्रीमती स्नेहा सुभाष पर्वते
४) श्री.संतोष वसंत गिरी
५) श्री.प्रफल्ल मधुसूदन पाठक
६) श्री.हेमंत शांताराम चव्हाण
७) श्रीमती सुनंदा नंदकुमार रघतवान
८) श्री. फतरु दादामिया शाह
९) श्री.अशोक रुकमाजी ठेवरे
१०) श्रीमती सुषमा बिपिन कांबळे
११) श्रीमती जयश्री दशरथ शिंदे
१२) श्री.बाळू छोटूराम सोळुंके
१३) श्री.भगवानराव नारायणराव शिंदे
१४) श्री.विजय शालीग्राम कोकाटे
१५) श्री.राजेश कृष्णराव मुक्तेवार
१६) श्री.यशवंत श्रीधरराव मेकेवाड
१७) श्री.राजेश श्रीकांत शिवदे
१८) श्री.अरुण भाऊसाहेब धोकटे
१९) श्री.प्रेमनाथ विठ्ठलराव कुमरे
२०) श्री.प्रविण परसराम बोरकर
२१) श्री.कांता तातेराव तुपे
२२) श्री.गजानन गुंडा माने
२३) श्री.रविंद्र रामगीर गोसावी
२४) श्री.अभय महादेवराव डंभे
२५) श्री.जगन्नाथ गंगाधर शिरसाट
२६) श्री.विवेक नाराण धारकर
२७) श्री.विजय चिंधू पांडव
२८) श्री.विलास नारायण मोरे
२९) श्री.घनश्याम आसाराम सोनवणे
३०) श्री.अजय पंढरी ब्राम्हणकर
३१) श्रीमती सुचेता प्रदिप तळवडेकर
३२) श्री.आनंद अभिमन्यू जगझाप

**महसूल विभाग निहाय पसंतीक्रमासाठी रिक्त पदांची संख्या खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | महसूल विभाग | | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| १ | नागपूर | | ०६ |
| २ | अमरावती | | ०५ |
| ३ | औरंगाबाद | | ०६ |
| ४ | कोकण | कोकण १ | ०३ |
| | | कोकण २ | ०८ |
| ५ | नाशिक | | ०२ |
| ६ | पुणे | | ०५ |
| ७ | एकूण | | ३५ |

(स.ज्ञा.पवार)
प्रबंधक (प्रशासन)
राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,
महाराष्ट्र, मुंबई

प्रत ः-

१. मा. प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर

**शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-२०१५/प्रक्र.१५६/का.१२,दिनांक २८/०४/२०१५. दिनांक १६/०७/२०१५ व १५/०६/२०१७ नुसार विभागीय संवर्गाकरीता दयावयाचा विकल्प**

.................................................................................................................................................

मी श्री/श्रीम.............................................................असे लिहून देता/देते की, माझा शिरस्तेदार/अधिक्षक/जनसंपर्क अधिकारी (अराजपत्रित गट ब ) या पदावर पदोन्नतीच्या निवडसूचीत झालेला समावेश असून सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २८/०४/२०१५, १६/०७/२०१५ व १५/०६/२०१७ च्या अधिसुचनेतील तरतुदीनुसार महसूली विभाग पसंतीक्रम सादर करणेबाबत राज्य आयोग, मुंबई यांचे पत्र दिनांक २८/०६/२०१७ नुसार कळविले आहे. सदर पदास महाराष्ट्र शासकीय गट-ब ( अराजपत्रित) या पदावर पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग (सुधारणा) नियम दिनांक २८/०४/२०१५, १६/०७/२०१५ व १५/०६/२०१७ लागू असून, माझी शिरस्तेदार/अधिक्षक/ जनसंपर्क अधिकारी पदावर पदोन्नती झाल्यावर या नियमावलीतील तरतुदी मला लागू होणार आहेत. सदर नियमावलीतील तरतुदीच्या अनुषंगाने मी शिरस्तेदार/अधिक्षक/जनसंपर्क अधिकारी माझा पहिला पसंतीक्रम ............................................ या विभागीय संवर्गासाठी देत आहे.

तसेच १) वरील शासन अधिसूचना दि.२८/०४/१५ व १५/०६/१७ अनुक्रमे अ.क्र.७ व ६ माझे प्रकरण येत नाही.

२) वरील शासन अधिसूचना दि.२८/०४/१५ व १५/०६/१७ अनुक्रमे अ.क्र.७ व ६ माझे प्रकरण येत असून त्यांच्या पुष्ठयर्थ आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रती सोबत जोडल्या आहेत. त्यामुळे मी माझा पसंतीक्रम ६ विभागापैकी .................................. हा विभाग देत आहे.

दिनांक - ......................

ठिकाण- .....................

स्वाक्षरी -............................................

नांव -...............................................

भ्रमणध्वनी क्र -...................................

पदनाम - .........................................

कार्यालयाचे नांव- ..................................

१) नागपूर २) अमरावती ३) औरंगाबाद ४) कोकण (कोकण-१ व कोकण-२) ५) नाशिक ६) पुणे या पैकी एक विभागीय संवर्ग नमूद करावा.

लागू नसेल ते खोडावे

RNI No. MAHBIL /2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष १, अंक २८(२)] मंगळवार, एप्रिल २८, २०१५/वैशाख ८, शके १९३७ [पृष्ठे ९, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ६१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सामान्य प्रशासन विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ एप्रिल २०१५

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक एसआरव्ही-२०१५/प्र.क्र. १५६/कार्या. १२.—भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान केलेल्या प्राधिकाराचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, " महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप याबाबत नियमावली, २०१० " आणि महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर पदोन्नतीने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप याबाबत नियमावली, २०१० या दोन्ही नियमावली आणि यासंदर्भातील सर्व शासन निर्णय, आदेश इ. रद्द करून पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांस " महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम, २०१५ " असे म्हणावे.

२. हे नियम ज्या दिनांकास अधिसूचित होतील, त्या दिनांकापासून गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित ) मधील सरळसेवेने व पदोन्नतीने भरावयाच्या पदांवर महसुली विभाग वाटप संदर्भात लागू होतील :

परंतु, जी पदे सेवाप्रवेश नियमानुसार राज्य स्तरावर बदलीपात्र आहेत अशा पदांनाच हे नियम लागू होतील :

परंतु आणखी असे की, हे नियम वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांमधील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहायक प्राध्यापक या पदांना लागू होणार नाहीत.

३. या नियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) " प्रशासकीय विभाग " याचा अर्थ, राज्य शासनाच्या मंत्रालयीनस्तरावरील विभाग ;

(ब) " नियुक्ती प्राधिकारी " याचा अर्थ " गट अ " आणि " गट ब " (राजपत्रित व अराजपत्रित) सेवेत किंवा त्या पदावर, संवर्गात किंवा सेवेत नेमणूक करण्यास सक्षम असलेला प्राधिकारी, असा आहे ;

(क) " आयोग " याचा अर्थ, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, असा आहे ;

(ड) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(इ) " गट अ " व " गट ब " पदे याचा अर्थ, राज्य शासनाच्या आदेशानुसार, वेळोवेळी गट " अ " आणि गट " ब " म्हणून वर्गीकृत केलेली शासनाच्या नियंत्रणाखालील पदे, असा आहे ;

(फ) " महसुली विभाग " याचा अर्थ, या अनुसूचीमध्ये नमूद केलेले राज्यातील सहा महसुली विभाग, असा आहे;

(ग) " अनुसूची " याचा अर्थ, या नियमासोबत जोडलेली अनुसूची, असा आहे ;

(ह) " निवडसमिती " याचा अर्थ, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतून महाराष्ट्र लोकसेवा आयोग ( विचारविनियमापासून सूट) विनियम, १९६५ नुसार वगळलेल्या गट " अ " व गट " ब " मधील पदांवर सरळसेवेने नियुक्तीसाठी स्थापन केलेली निवडसमिती, असा आहे ;

(ज) " राज्य " याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य, असा आहे ;

(ल) " राज्यस्तरीय विभागप्रमुख " म्हणजे राज्य शासनाच्या प्रशासकीय विभागाच्या नियंत्रणाखाली असलेल्या राज्यस्तरीय यंत्रणेचे प्रमुख.

४. गट " अ " व गट " ब " मधील सरळसेवेने तसेच पदोन्नतीने भरण्यात येणाऱ्या पदांवर या नियमावलीच्या अनुसूचीत नमूद केलेल्या सहा महसुली विभागात या नियमांनुसार नियुक्ती करण्यात येईल.

५. अशी नियुक्ती करण्यापूर्वी शासनाचे संबंधित प्रशासकीय विभाग आपल्याकडील गट " अ " व गट " ब " मधील प्रत्येक संवर्गातील सरळसेवा कोट्याची व पदोन्नती कोट्याची पदे महसूल विभाग निहाय निश्चित करेल.

६. अशा निश्चित केलेल्या सरळसेवा कोट्याच्या व पदोन्नती कोट्याच्या पदांवर नियुक्ती देताना सहा महसुली विभागांतील वाटप पुढीलप्रमाणे करण्यात येईल :—

(अ) गट " अ " व गट " ब " पदावर सरळसेवेने नियुक्तीकरिता, यथास्थिती, आयोग किंवा निवडसमिती यांच्याकडून शिफारस किंवा गुणवत्ता यादी प्राप्त झाल्यावर, विहित प्रमाणपत्रे व अन्य कागदपत्रांची पडताळणी झाल्यावर, प्रत्यक्ष महसुली विभाग वाटप करण्यात येईल त्यावेळेस त्या संवर्गात सरळसेवा कोट्यातील एकूण रिक्त पदांची संख्या विचारात घेऊन, गुणवत्ता यादीतील क्रमांकानुसार अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे नागपूर, अमरावती, औरंगाबाद व नाशिक या क्रमानुसार **चक्राकार** पद्धतीने, महसुली विभाग वाटप करण्यात यावे. या चारही महसुली विभागांतील सरळसेवा कोट्याची रिक्त पदे भरल्यानंतर गुणवत्ता यादीतील उर्वरित उमेदवारांना कोकण विभाग व पुणे विभाग या क्रमाने विभाग वाटप करावा.

(ब) गट " अ " व गट " ब " पदावर पदोन्नतीने नियुक्तीकरिता निवडसूचीत समावेश असलेल्या अधिकाऱ्याला प्रत्यक्ष महसुली विभाग वाटप करण्यात येईल त्यावेळेस त्या संवर्गात पदोन्नती कोट्यातील एकूण रिक्त पदांची संख्या विचारात घेऊन, त्याच्या संबंधित निवडसूचीतील क्रमांकानुसार, अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे नागपूर, अमरावती, औरंगाबाद व नाशिक या क्रमानुसार **चक्राकार** पद्धतीने, महसुली विभाग वाटप करण्यात यावे. या चारही महसुली विभागांतील पदोन्नती कोट्याची रिक्त पदे भरल्यानंतर निवडसूचीतील उर्वरित अधिकाऱ्यांना कोकण विभाग व पुणे विभाग या क्रमाने विभाग वाटप करावा :

परंतु असे की, निवडसूचीतील गोपनीय अहवाला अभावी खुली ठेवलेली, जातवैधता प्रमाणपत्र प्राप्त नसलेली आणि विभागीय चौकशी किंवा न्यायालयीन कार्यवाही चालू असलेली प्रकरणे वगळून उर्वरित अधिकाऱ्यांना एकाचवेळी महसुली विभाग वाटप करण्यात यावे. अशाप्रकारे वगळण्यात आलेल्या प्रकरणी अंतिम निर्णयानंतर स्वतंत्रपणे महसुली विभाग वाटप करण्यात यावे.

७. खालील प्रकरणे नियम ४ व ६ मधून वगळण्यात यावीत :—

I. ज्या अधिकाऱ्यास विभाग वाटपाच्यावेळी सेवानिवृत्तीस १ वर्षापेक्षा कमी कालावधी शिल्लक आहे ;

II. जे अधिकारी स्वतः अपंग आहेत ;

III. ज्या अधिकाऱ्याचा जोडीदार किंवा त्याचे मूल मतिमंद आहे ;

IV. ज्या स्त्री अधिकारी विधवा किंवा परित्यक्त्या आहेत,

अशा प्रकरणी संबंधित प्रशासकीय विभागाने रिक्त पदांची उपलब्धता विचारात घेऊन, अशा अधिकाऱ्यास त्याच्या सोयीचा महसुली विभाग वाटप करावा.

८. (१) सरळसेवेने नियुक्त झालेल्या उमेदवारांच्या बाबतीत,—

(अ) गट " अ " संवर्गात नियुक्त झालेल्या उमेदवारांनी त्या महसुली विभागात किमान सहा वर्षे इतका सेवा कालावधी पूर्ण करणे आवश्यक राहील ;

(ब) तसेच, गट " ब " संवर्गात नियुक्त झालेल्या उमेदवारांनी त्या महसुली विभागात किमान नऊ वर्षे इतका सेवा कालावधी पूर्ण करणे आवश्यक राहील ;

(२) वरीलप्रमाणे पदस्थापना दिल्यावर यथास्थिती सहा वर्षे अथवा नऊ वर्षे सेवा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी पुढील पदोन्नती मिळत असल्यास पदोन्नती नंतरही त्याच महसुली विभागात पदस्थापना करण्यात येईल :

परंतु, पुढील पदोन्नतीच्यावेळी त्या महसुली विभागात पद उपलब्ध नसल्यास यथास्थिती सहा अथवा नऊ वर्षे सेवा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी पदोन्नतीने अन्य महसुली विभागात पदस्थापना देता येईल :

परंतु असे की, पद उपलब्ध नसल्याने त्या महसुली विभागात यथास्थिती सहा वर्षे अथवा नऊ वर्षे सेवा कालावधी पूर्ण झालेला नाही अशा अधिकाऱ्यांच्या बाबतीत उर्वरित कालावधीकरिता पुन्हा मूलतः वाटप झालेल्या महसुली विभागात पदोन्नतीने अथवा बदलीने पदस्थापना करता येईल :

परंतु आणखी असे की, महसुली विभाग वाटप केल्यानंतर त्या महसुली विभागात यथास्थिती सहा वर्षे अथवा नऊ वर्षे सेवा कालावधी पूर्ण झाल्यावर अशा अधिकाऱ्यास त्या महसुली विभागाव्यतिरिक्त पद उपलब्धतेनुसार अन्य कोणत्याही महसुली विभागात पदस्थापना देण्यात येईल व ती त्या अधिकाऱ्याने स्वीकारणे बंधनकारक राहील.

९. (१) पदोन्नतीने नियुक्त झालेल्या उमेदवारांच्या बाबतीत,—

(अ) गट " अ " संवर्गात नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांनी त्या महसुली विभागात किमान तीन वर्षे इतका सेवा कालावधी पूर्ण करणे आवश्यक राहील ;

(ब) तसेच गट " ब " संवर्गात नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांनी त्या महसुली विभागात किमान सहा वर्षे इतका सेवा कालावधी पूर्ण करणे आवश्यक राहील,

(२) वरीलप्रमाणे पदस्थापना दिल्यावर यथास्थिती तीन वर्षे अथवा सहा वर्षे सेवा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी पुढील पदोन्नती मिळत असल्यास पदोन्नती नंतरही त्याच महसुली विभागात पदस्थापना करण्यात येईल :

परंतु, पुढील पदोन्नतीच्यावेळी त्या महसुली विभागात पद उपलब्ध नसल्यास यथास्थिती तीन अथवा सहा वर्षे सेवा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी पदोन्नतीने अन्य महसुली विभागात पदस्थापना देता येईल :

परंतु असे की, पद उपलब्ध नसल्याने त्या महसुली विभागात यथास्थिती तीन वर्षे अथवा सहा वर्षे सेवा कालावधी पूर्ण झालेला नाही अशा अधिकाऱ्यांच्या बाबतीत उर्वरित कालावधीकरिता पुन्हा मूलतः वाटप झालेल्या महसुली विभागात पदोन्नतीने अथवा बदलीने पदस्थापना करता येईल :

परंतु आणखी असे की, महसुली विभाग वाटप केल्यानंतर त्या महसुली विभागात यथास्थिती तीन वर्षे अथवा सहा वर्षे सेवा कालावधी पूर्ण झाल्यावर अशा अधिकाऱ्यास त्या महसुली विभागाव्यतिरिक्त पद उपलब्धतेनुसार अन्य कोणत्याही महसुली विभागात पदस्थापना देण्यात येईल व ती त्या अधिकाऱ्याने स्वीकारणे बंधनकारक राहील.

१०. गट " अ " व गट " ब " मधील प्रत्येक संवर्गातील सरळसेवा कोट्याच्या व पदोन्नती कोट्याच्या महसुली विभागनिहाय निश्चित केलेल्या पदांवर प्रत्येक महसुली विभागातील कार्यरत अधिकाऱ्यांची पदनिहाय स्वतंत्र यादी नियुक्ती प्राधिकाऱ्याने ठेवणे व ती वेळोवेळी अद्ययावत करणे आवश्यक राहील.

११. (१) या नियमातील तरतुदीनुसार गट " अ " पदावर सरळसेवेने आणि पदोन्नतीने नियुक्ती करताना महसुली विभाग वाटपाचे अधिकार संबंधित प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात येत आहेत आणि यासाठी शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाची सहमती घेण्याची आवश्यकता नाही.

(२) या नियमांतील तरतुदीनुसार गट " ब " पदावर सरळसेवेने आणि पदोन्नतीने नियुक्ती करताना महसुली विभाग वाटपाचे अधिकार संबंधित प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखालील राज्यस्तरीय विभाग प्रमुख यांना प्रदान करण्यात येत आहेत आणि यासाठी शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाची सहमती घेण्याची आवश्यकता नाही.

१२. या नियम तरतुदीनुसार महसुली विभाग वाटप केल्यानंतर, वाटप करण्यात आलेल्या विभागात किमान एक वर्ष सेवा पूर्ण केल्यानंतरच, खालील कारणास्तव संबंधित अधिकारी विभाग बदलून मिळण्यासाठी अर्ज करू शकेल :—

**(अ)** शासकीय अधिकारी स्वतः किंवा यथास्थिती पती वा पत्नी वा त्याची मुले वा त्यांच्यावर अवलंबून असलेले शासकीय अधिकाऱ्याचे आई किंवा वडील यांचे पुढील आजार :—

१. हृदय शस्त्रक्रियांची प्रकरणे

२. मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया किंवा किडनी डायलेसिस

३. कर्करोग

४. ब्रेन ट्युमर किंवा मेंदूवरील शस्त्रक्रिया

५. निश्चेतनावस्था (कोमा)

६. मनोविकृतीने ग्रस्त

**(ब) पती-पत्नी एकत्रिकरण**—केंद्र किंवा राज्य शासकीय किंवा निमशासकीय कार्यालये, महानगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती अथवा शासकीय शैक्षणिक संस्थेमध्ये (शासकीय अनुदानित खाजगी शिक्षणसंस्था खेरीज) पती किंवा पत्नी कार्यरत असल्यास,

(i) कोकण व पुणे महसुली विभागातून केवळ नागपूर, अमरावती, औरंगाबाद व नाशिक हे महसुली विभागच बदलून देता येतील.

(ii) नागपूर, अमरावती, औरंगाबाद व नाशिक या पैकी एका महसुली विभागाऐवजी दुसरा महसुली विभाग बदलून देता येईल.

**(क) आपसात महसुली विभाग बदलून देणे—**

(i) सरळसेवेने नियुक्त होणाऱ्या अधिकाऱ्यांना वाटून दिलेला महसुली विभाग आपसात बदली (Mutual Change) या कारणास्तव बदलावयाची मागणी केल्यास, केवळ सरळसेवेने नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांमध्येच आपसात महसुली विभाग बदल करता येईल.

(ii) पदोन्नतीने नियुक्त होणाऱ्या अधिकाऱ्यांना वाटून दिलेला महसुली विभाग आपसात बदली (Mutual Change) या कारणास्तव बदलावयाची मागणी केल्यास, केवळ पदोन्नतीने नियुक्त झालेल्या कोणत्याही निवडसूचीतील अधिकाऱ्यांमध्येच आपसात महसुली विभाग बदल करता येईल.

तथापि, अशा प्रकारे आपसात महसुली विभाग बदली या कारणास्तव महसुली विभाग बदल करताना पुणे व कोकण महसुली विभागातून नागपूर किंवा अमरावती किंवा औरंगाबाद किंवा नाशिक महसुली विभागात बदलून जाणाऱ्या अधिकाऱ्यांनी प्रथम अशा बदलून दिलेल्या महसुली विभागात रुजू होणे आवश्यक आहे.

१३. या नियमानुसार वाटप झालेला महसुली विभाग उपरोक्त नियम १२ मध्ये नमूद केलेल्या कारणास्तव संबंधित प्रशासकीय विभाग बदलून देऊ शकेल. यासाठी वेगळ्याने सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेची आवश्यकता राहणार नाही.

१४. सदरहू नियम **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकास, जी प्रकरणे महसुली विभाग वाटपासाठी व वाटप झालेला महसुली विभाग बदलून देण्यासाठी प्रलंबित असतील, ती प्रकरणे या नियमावलीतील तरतुदीनुसार निकाली काढली जातील.

## अनुसूची

**(पहा** नियम ४**)**

| अ.क्र. (१) | महसुली विभाग (२) | जिल्हे (३) |
|---|---|---|
| १ | नागपूर | नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा (एकूण सहा जिल्हे) |
| २ | अमरावती | अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ (एकूण पाच जिल्हे) |
| ३ | औरंगाबाद | औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, उस्मानाबाद, बीड (एकूण आठ जिल्हे) |
| ४ | नाशिक | नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर (एकूण पाच जिल्हे) |
| ५ | कोकण | मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग (एकूण सात जिल्हे) |
| ६ | पुणे | पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर (एकूण पाच जिल्हे) |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. भगवान सहाय,**
शासनाचे अपर मुख्य सचिव (सेवा).

RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष १, अंक ५२] गुरुवार, जुलै १६, २०१५/आषाढ २५, शके १९३७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १०६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सामान्य प्रशासन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ जुलै २०१५

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक एसआरव्ही. २०१५/प्र.क्र. १५६/कार्या १२.— भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान केलेल्या प्राधिकाराचा वापर करुन महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम, २०१५ मध्ये सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांस '' महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप ( सुधारणा) नियम, २०१५" असे म्हणावे.

२. '' महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम, २०१५'' (यात यापुढे ज्याचा निर्देश '' मुख्य नियम '' असा करण्यात आला आहे.) याच्या नियम २ मधील दुसऱ्या परंतुकानंतर खालील परंतुक समाविष्ट करण्यात येत आहे.

परंतु आणखी असे की, या नियमांची अंमलबजावणी गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित ) पदांवरील पोलीस दलातील अधिकारी आणि विक्रीकर विभागातील अधिकारी यांचेकरिता हे नियम **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १ वर्षापर्यंत स्थगित ठेवण्यात येत आहे.

३. मुख्य नियमाच्या नियम ६ मधील (ब) खालीलप्रमाणे सुधारित करण्यात यावा:—

'' (ब) गट '' अ '' व गट '' ब '' पदावर पदोन्नतीने नियुक्तीकरिता निवडसूचीत समावेश असलेल्या अधिकाऱ्यांकडून नागपूर/ अमरावती/ औरंगाबाद/नाशिक या महसुली विभागांसाठी पसंतीक्रम घेण्यात यावा. जे अधिकारी नागपूर,अमरावती,औरंगाबाद व नाशिक या विभागाकरिता पसंतीक्रम देतील त्यांना त्यांच्या पसंतीच्या संबंधित महसुली विभागात पदोन्नती कोट्यात त्यावेळी असलेल्या पदांच्या उपलब्धतेनुसार महसुली विभाग वाटप करण्यात यावे. निवडसूचीतील उर्वरित अधिकाऱ्यांना निवडसूचीतील क्रमांकानुसार, पदोन्नती कोट्यातील त्यावेळी रिक्त असलेली उर्वरित पदे विचारात घेऊन अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे नागपूर, अमरावती, औरंगाबाद व नाशिक

या क्रमानुसार चक्राकार पद्धतीने, महसुली विभाग वाटप करण्यात यावे. या चारही महसुली विभागातील पदोन्नती कोट्याची रिक्त पदे भरल्यानंतर निवडसूचीतील उर्वरित अधिकाऱ्यांना कोकण विभाग व पुणे विभाग या क्रमाने विभाग वाटप करावा.

परंतु असे की, एका निवडसूचीत समाविष्ट असलेले परंतु गोपनीय अहवालाअभावी, जातवैधता प्रमाणपत्र प्राप्त नसल्याने आणि विभागीय चौकशी चालू असल्याने किंवा न्यायालयीन कार्यवाही सुरु असल्याने खुल्या ठेवलेल्या प्रकरणातील अधिकारी वगळून उर्वरित अधिकाऱ्यांना एकाचवेळी महसुली विभाग वाटप करण्यात यावे. अशाप्रकारे वगळण्यात आलेल्या प्रकरणी अंतिम निर्णयानंतर स्वतंत्रपणे महसुली विभाग वाटप करण्यात यावे."

४. मुख्य नियमाच्या नियम ७ मधील (i) च्या ऐवजी खालीलप्रमाणे अंतर्भाव करण्यात यावा.

(i) विभागीय पदोन्नती समितीने ज्या तारखेस पदोन्नतीस पात्र असल्याची शिफारस केली असेल त्या तारखेस ज्या अधिकाऱ्यास सेवा निवृत्तीस तीन वर्ष किंवा त्यापेक्षा कमी कालावधी शिल्लक आहे.

५. मुख्य नियमातील नियम १२ (ब) (ii) नंतर खालील परंतुकाचा समावेश करण्यात यावा.

'' परंतु, पदोन्नतीने नियुक्तीसाठी, महसुली विभागात पद रिक्त असल्यास वाटप केलेला महसुली विभाग बदलून देण्याची अधिकाऱ्याची विनंती विचारात घेता येईल.''

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. भगवान सहाय,**
शासनाचे अपर मुख्य सचिव (सेवा).

RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MCS/173/2016-18

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ३, अंक ५९(३)] गुरुवार, जून १५, २०१७/ज्येष्ठ २५, शके १९३९ [पृष्ठे १०, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ९८**

**प्राधिकृत प्रकाशन**

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

**सामान्य प्रशासन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ जून २०१७.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक एसआरव्ही. २०१७/प्र.क्र.११४/कार्या-१२.— भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान केलेल्या प्राधिकाराचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासकीय गट “अ” व गट “ब” (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटप नियम,२०१५ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांस महाराष्ट्र शासकीय गट “अ” व गट “ब” (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटप (दुसरी सुधारणा) नियम,२०१७ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र शासकीय गट “अ” व गट “ब” (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटप नियम, २०१५( यात यापुढे ज्याचा निर्देश “मुख्य नियम” असा करण्यात आला आहे.) याच्या नियम ३ मधील,—

(१) खंड (फ) खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात यावा :—

“(फ) “महसुली विभाग” याचा अर्थ,अनुसूचीत नमूद केल्यानुसार कोकण-१ आणि कोकण-२ याचा समावेश असलेल्या कोकण महसुली विभागासह अनुसूचीमध्ये नमूद केलेले राज्याचे महसुली विभाग असा आहे ; ” ;

(२) खंड (ग), नंतर खालील खंडाचा अंतर्भाव करण्यात यावा :—

“(ग-१) “अनुसूचित क्षेत्र” याचा अर्थ, भारतीय संविधानाच्या पाचव्या अनुसूचीतील भाग क मधील सहाव्या परिच्छेदानुसार राष्ट्रपतींनी आदेशान्वये वेळोवेळी घोषित केलेले अनुसूचित क्षेत्र.”

३. मुख्य नियमातील नियम ४ खालीलप्रमाणे सुधारित करण्यात यावा :—

" ४. गट "अ" व "ब" मधील पदांवर सरळसेवेद्वारे आणि पदोन्नतीद्वारे नियुक्ती, या नियमानुसार महसूली विभागांमध्ये करण्यात येईल."

४. मुख्य नियमातील नियम ५ खालीलप्रमाणे सुधारित करण्यात यावा :—

"५. अशी नियुक्ती करण्यापूर्वी, शासनाचा प्रत्येक प्रशासकीय विभाग त्यांच्याकडील गट "अ" व गट "ब" मधील प्रत्येक संवर्गातील पदे, महसूल विभाग निहाय निश्चित करेल."

५. मुख्य नियमातील नियम ६ खालीलप्रमाणे सुधारित करण्यात यावा :—

"६. नियम ५ नुसार निश्चित केलेल्या पदांवर नियुक्ती देताना महसूली विभागाचे वाटप पुढीलप्रमाणे करण्यात येईल :-

(अ) **सरळसेवेने नियुक्तीकरिता**.—

(१) गट "अ" व गट "ब" पदावर सरळसेवेने नियुक्तीकरिता, यथास्थिती, आयोग किंवा निवड समिती यांच्याकडून शिफारस किंवा गुणवत्ता यादी प्राप्त झाल्यावर, विहित प्रमाणपत्रे व अन्य कागदपत्रांची पडताळणी करून, शिफारस किंवा गुणवत्तायादीनुसार महसुली विभाग वाटपासाठी उपलब्ध उमेदवारांची यादी तयार करावी . त्यानंतर, वाटपाच्या वेळी महसूल विभागनिहाय रिक्त पदांची संख्या सर्व उमेदवारांना कळवून, नियुक्तीच्या अनुषंगाने त्यांच्याकडून नागपूर, अमरावती, औरंगाबाद, कोकण विभागाचा भाग असलेला कोकण -१, नाशिक, कोकण विभागाचा भाग असलेला कोकण-२, पुणे या पैकी कोणत्याही एकाच महसुली विभागाची पसंती घेण्यात यावी. तसेच, नियम ७ नुसार प्रकरण येत असल्यास, त्याबाबतचीही माहिती घेण्यात यावी.

(२) गुणवत्ता यादीतील नियम ७ नुसार विहित केलेल्या प्रकरणातील उमेदवारांना, त्यांनी पसंती दिलेल्या महसुली विभागात पद रिक्त असल्यास त्यांना प्रथम त्यांच्या सोयीचा महसुली विभाग वाटप करावा.

(३) उपरोक्त उपखंड (२) नुसार महसुली विभाग वाटप केल्यानंतर, नागपूर , अमरावती व औरंगाबाद महसुली विभागातील मंजूर पदांच्या ८० टक्के इतकी पदे भरण्यासाठी, आवश्यक असलेल्या पदांची संख्या निश्चित करावी.

(४) (i) वरील उपखंड (२) प्रमाणे पदे भरण्यासाठी आवश्यक असलेली पद संख्या व उपखंड (३) प्रमाणे तीन महसुली विभागात पदे भरण्यासाठी आवश्यक असलेली पद संख्या, यथास्थिती, आयोग किंवा निवड समिती यांच्याकडून प्राप्त झालेल्या शिफारस किंवा गुणवत्ता यादी पैकी एकूण वाटपासाठी उपलब्ध असलेल्या उमेदवारांच्या पदसंख्येतून वजा करण्यात यावी. त्यानंतर वाटपासाठी उपलब्ध असलेल्या उर्वरित पदसंख्येच्या ८० टक्के पदे पाच महसुली विभागांसाठी म्हणजे नागपूर, अमरावती, औरंगाबाद, कोकण विभागाचा भाग असलेला कोकण -१ व नाशिक या महसुली विभागांकरिता सुनिश्चित करण्यात यावी आणि २० टक्के पदे दोन महसुली विभागांसाठी म्हणजे कोकण विभागाचा भाग असलेला कोकण -२ व पुणे या महसुली विभागांसाठी सुनिश्चित करण्यात यावी.

(ii) वरील उपखंड (i) प्रमाणे उर्वरित वाटपासाठी उपलब्ध पदसंख्येच्या ८० टक्के पदे नागपूर, अमरावती, औरंगाबाद, कोकण विभागाचा भाग असलेला कोकण-१ व नाशिक या महसुली विभागांकरिता सुनिश्चित केल्यानंतर, या पाच महसुली विभागांतील रिक्त पदांच्या प्रमाणात (Proportionately) या पाच महसुली विभागात वाटप करण्यात यावे. तसेच, उर्वरित वाटपासाठी उपलब्ध पदसंख्येच्या २० टक्के पदे कोकण विभागाचा भाग असलेला कोकण -२ व पुणे या महसुली विभागांकरिता सुनिश्चित केल्यानंतर, या दोन महसुली विभागांतील रिक्त पदांच्या प्रमाणात (Proportionately) या दोन महसुली विभागात वाटप करण्यात यावे.

(५) नियम ७ नुसार सूट दिलेली प्रकरणे वगळून, उर्वरित उमेदवारांना त्यांनी दिलेल्या पसंतीनुसार, महसुली विभागात वाटपासाठी उपलब्ध पदांच्या मर्यादेत, आयोग किंवा निवड समिती यांच्याकडून प्राप्त झालेल्या शिफारस किंवा गुणवत्ता यादीतील क्रमांकानुसार, महसुली विभाग वाटप करण्यात यावे.

(६) उपरोक्त उपखंड (५) नुसार महसुली विभाग वाटप केल्यानंतर, उमेदवारांनी पसंती दिलेल्या महसुली विभागात वाटपासाठी पद उपलब्ध नसल्यास, अशा शिफारस किंवा गुणवत्ता यादीतील उर्वरित उमेदवारांना, त्यांच्या गुणवत्ता यादीतील क्रमांकानुसार, सर्व महसुली विभागातील वाटपासाठी उपलब्ध उर्वरित रिक्त पदे विचारात घेऊन, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, कोकण विभागाचा भाग असलेला कोकण -१, नाशिक, कोकण विभागाचा भाग असलेला कोकण -२ व पुणे महसुली विभाग या क्रमाने चक्राकार पध्दतीने महसूली विभाग वाटप करण्यात यावे.

(७) वाटप केलेल्या महसुली विभागामधील जिल्ह्यांतील रिक्त पदे, अनुसूचीमध्ये महसुली विभागासमोर दर्शविलेल्या जिल्ह्यांच्या क्रमवारीनुसार भरली जातील याची प्रशासकीय विभाग दक्षता घेईल.

परंतु असे की, प्रशासकीय विभागास प्राथम्याने फक्त अनुसूचीत क्षेत्रातील रिक्त पदे भरण्याची आवश्यकता असल्यास, सर्व प्रथम अनुसूचीत क्षेत्रात रिक्त पदे असलेले महसुली विभाग, उमेदवारांना त्यांनी दिलेल्या पसंतीनुसार महसुली विभागात वाटपासाठी उपलब्ध पदांच्या अधीन राहून आयोग किंवा निवडसमिती यांच्याकडून प्राप्त झालेल्या शिफारस किंवा गुणवत्ता यादीतील क्रमांकानुसार वाटप करण्यात यावे. उमेदवारांनी पसंती दिलेल्या महसुली विभागात अनुसूचीत क्षेत्रातील रिक्त पदे नसल्यास, अशा शिफारस किंवा गुणवत्ता यादीतील उमेदवारांना, त्यांच्या गुणवत्ता यादीतील क्रमांकानुसार, अनुसूचीत क्षेत्रात रिक्त पदे असलेले उर्वरित महसुली विभाग नागपूर, अमरावती, औरंगाबाद, कोकण विभागाचा भाग असलेला कोकण-१ , नाशिक, कोकण विभागाचा भाग असलेला कोकण-२ व पुणे महसुली विभाग या क्रमाने चक्राकार पद्धतीने वाटप करण्यात यावे. अनुसूचीत क्षेत्रातील रिक्त पदे भरल्यानंतर गुणवत्ता यादीतील उर्वरित उमेदवारांना या नियमाच्या वरील खंड (अ) प्रमाणे महसुली विभाग वाटप करावा.

(ब) **पदोन्नतीने नियुक्तीकरिता.—**

(१) गट "अ" व गट "ब" पदावर पदोन्नतीने नियुक्तीकरिता, महसुली विभाग वाटपासाठी उपलब्ध अधिकाऱ्यांची यादी तयार करावी. त्यानंतर, वाटपाच्या वेळी महसूल विभागनिहाय रिक्त पदांची संख्या निवडसूचीतील सर्व अधिकाऱ्यांना कळवून, नियुक्तीच्या अनुषंगाने त्यांच्याकडून नागपूर, अमरावती, औरंगाबाद, कोकण विभागाचा भाग असलेला कोकण -१, नाशिक, कोकण विभागाचा भाग असलेला कोकण-२, पुणे या पैकी कोणत्याही एकाच महसुली विभागाची पसंती घेण्यात यावी. तसेच, नियम ७ नुसार प्रकरण येत असल्यास, त्याबाबतचीही माहिती घेण्यात यावी.

(२) निवड यादीतील नियम ७ नुसार विहित केलेल्या प्रकरणातील अधिकाऱ्यांना, त्यांनी पसंती दिलेल्या महसुली विभागात पद रिक्त असल्यास त्यांना प्रथम त्यांच्या सोयीचा महसुली विभाग वाटप करावा.

(३) उपरोक्त उपखंड (२ ) नुसार महसुली विभाग वाटप केल्यानंतर, नागपूर, अमरावती व औरंगाबाद महसुली विभागातील मंजूर पदांच्या ८० टक्के इतकी पदे भरण्यासाठी, आवश्यक असलेल्या पदांची संख्या निश्चित करावी.

(४) (*i*) वरील उपखंड (२) प्रमाणे पदे भरण्यासाठी आवश्यक असलेली पदसंख्या व उपखंड (३) प्रमाणे तीन महसुली विभागात पदे भरण्यासाठी आवश्यक असलेली पदसंख्या, निवडयादीतील एकूण वाटपासाठी उपलब्ध असलेल्या अधिकाऱ्यांच्या पदसंख्येतून वजा करण्यात यावी. त्यानंतर वाटपासाठी उपलब्ध असलेल्या उर्वरित पदसंख्येच्या ८० टक्के पदे पाच महसुली विभागांसाठी म्हणजे नागपूर, अमरावती, औरंगाबाद, कोकण विभागाचा भाग असलेला कोकण-१ व नाशिक या महसुली विभागांकरिता सुनिश्चित करण्यात यावी आणि २० टक्के पदे दोन महसुली विभागांसाठी म्हणजे कोकण विभागाचा भाग असलेला कोकण -२ व पुणे या महसुली विभागांसाठी सुनिश्चित करण्यात यावी.

(*ii*) वरील उपखंड (*i*) प्रमाणे उर्वरित वाटपासाठी उपलब्ध पदसंख्येच्या ८० टक्के पदे नागपूर, अमरावती, औरंगाबाद, कोकण विभागाचा भाग असलेला कोकण-१ व नाशिक या महसूली विभागांकरिता सुनिश्चित केल्यानंतर, या पाच महसुली विभागांतील रिक्त पदांच्या प्रमाणात (Proportionately) या पाच महसुली विभागात वाटप करण्यात यावे. तसेच, उर्वरित वाटपासाठी उपलब्ध पदसंख्येच्या २० टक्के पदे कोकण विभागाचा भाग असलेला कोकण -२ व पुणे या महसूली विभागांकरिता सुनिश्चित केल्यानंतर, या दोन महसुली विभागांतील रिक्त पदांच्या प्रमाणात (Proportionately) या दोन महसुली विभागात वाटप करण्यात यावे.

(५) नियम ७ नुसार सूट दिलेली प्रकरणे वगळून, उर्वरित अधिकाऱ्यांना त्यांनी दिलेल्या पसंतीनुसार, महसुली विभागात वाटपासाठी उपलब्ध पदांच्या मर्यादेत, निवड यादीतील क्रमांकानुसार, महसुली विभाग वाटप करण्यात यावे.

(६) उपरोक्त उपखंड (५) नुसार महसुली विभाग वाटप केल्यानंतर, अधिकाऱ्यांनी पसंती दिलेल्या महसुली विभागात वाटपासाठी पद उपलब्ध नसल्यास, अशा निवडयादीतील उर्वरित अधिकाऱ्यांना, त्यांच्या निवडयादीतील क्रमांकानुसार, सर्व महसुली विभागातील वाटपासाठी उपलब्ध उर्वरित रिक्त पदे विचारात घेऊन, नागपूर,अमरावती,औरंगाबाद, कोकण विभागाचा भाग असलेला कोकण-१ , नाशिक, कोकण विभागाचा भाग असलेला कोकण-२ व पुणे महसुली विभाग या क्रमाने चक्राकार पध्दतीने महसुली विभाग वाटप करण्यात यावे.

(७) वाटप केलेल्या महसुली विभागामधील जिल्ह्यांतील रिक्त पदे, अनुसूचीमध्ये महसुली विभागासमोर दर्शविलेल्या जिल्हयांच्या क्रमवारीनुसार भरली जातील याची प्रशासकीय विभाग दक्षता घेईल.

परंतु असे की, एका निवडसूचीत समाविष्ट असलेले परंतु गोपनीय अहवालाअभावी, जातवैधता प्रमाणपत्र प्राप्त नसल्याने आणि विभागीय चौकशी चालू असल्याने किंवा न्यायालयीन कार्यवाही सरू असल्याने खुल्या ठेवलेल्या प्रकरणातील अधिकारी वगळून उर्वरित अधिकाऱ्यांना एकाचवेळी महसूली विभाग वाटप करण्यात यावे. अशाप्रकारे वगळण्यात आलेल्या प्रकरणी, अंतिम निर्णयानंतर त्यांना स्वतंत्रपणे महसुली विभाग वाटप करण्यात यावे.

या नियमाच्या खंड (अ) व (ब) मधील कार्यपद्धतीनुसार महसुली विभाग वाटप करण्यासाठी स्पष्टीकरणात्मक उदाहरण या नियमास जोडलेल्या परिशिष्टामध्ये देण्यात आले आहे. "

६. मुख्य नियमातील नियम ७ खालीलप्रमाणे सुधारित करण्यात यावा :—

"७. खालील प्रकरणे नियम ४ व ६ मधून वगळण्यात यावीत :—

(अ) जे अधिकारी स्वतः अपंग आहेत ;

(ब) ज्या अधिकाऱ्याचा जोडीदार किंवा त्याचे मूल मतिमंद आहे; किंवा ज्या अधिकाऱ्यांनी मतिमंद असलेल्या स्वतःच्या भावाचे किंवा बहिणीचे पालकत्व स्वीकारलेले आहे ;

(क) ज्या स्त्री अधिकारी विधवा किंवा परित्यक्त्या आहेत ;

(ड) विभागीय पदोन्नती समितीने ज्या तारखेस पदोन्नतीस पात्र असल्याची शिफारस केली असेल त्या तारखेस ज्या अधिकाऱ्यास सेवा निवृत्तीस तीन वर्ष किंवा त्यापेक्षा कमी कालावधी शिल्लक आहे.

अशा प्रकरणी संबंधित प्रशासकीय विभागाने उपरोक्त क्रम व रिक्त पदांची उपलब्धता विचारात घेऊन, अशा अधिकाऱ्यास त्याच्या सोयीचा महसुली विभाग वाटप करावा."

७. मुख्य नियमातील नियम १० खालीलप्रमाणे सुधारित करण्यात यावा :—

"१०. गट "अ" व गट "ब" मधील प्रत्येक संवर्गातील प्रत्येक महसुली विभागातील कार्यरत अधिकाऱ्यांची पदनिहाय यादी नियुक्ती प्राधिकाऱ्याने ठेवणे व ती वेळोवेळी अद्ययावत करणे आवश्यक राहील."

८. मुख्य नियमातील नियम १२ खालीलप्रमाणे सुधारित करण्यात यावा,—

(अ) खंड (ब) चा उपखंड (*i*) आणि (*ii*) खालीलप्रमाणे सुधारित करण्यात यावा :—

"(*i*) कोकण विभागाचा भाग असलेला कोकण -२ व पुणे महसुली विभागातून केवळ नागपूर, अमरावती, औरंगाबाद, कोकण विभागाचा भाग असलेला कोकण -१ व नाशिक हे महसुली विभागच बदलून देता येतील.

(*ii*) नागपूर, अमरावती, औरंगाबाद, कोकण विभागाचा भाग असलेला कोकण -१ व नाशिक यापैकी एका महसुली विभागाऐवजी दुसरा महसुली विभाग बदलून देता येईल :

परंतु असे की, पदोन्नतीने नियुक्तीसाठी, महसुली विभागात पद रिक्त असल्यास वाटप केलेला महसुली विभाग बदलून देण्याची अधिकाऱ्याची विनंती विचारात घेता येईल."

(ब) खंड (क) खालील परंतुक खालीलप्रमाणे सुधारित करण्यात यावे :—

" परंतु, अशाप्रकारे आपसात महसुली विभाग बदली या कारणास्तव महसुली विभाग बदल करताना पुणे व कोकण विभागाचा भाग असलेला कोकण -२ महसुली विभागातून नागपूर किंवा अमरावती किंवा औरंगाबाद किंवा कोकण विभागाचा भाग असलेला कोकण -१ किंवा नाशिक महसुली विभागात बदलून जाणाऱ्या अधिकाऱ्यांनी प्रथम अशा बदलून दिलेल्या महसुली विभागात रुजू होणे आवश्यक आहे."

९. मुख्य नियमातील अनुसूची ऐवजी खालीलप्रमाणे अनुसूची व परिशिष्ट समाविष्ट करण्यात यावे :—

## अनुसूची

[पहा मुख्य नियम ३ (फ)]

| अ.क्र. (१) | महसुली विभाग (२) | जिल्हे (३) |
|---|---|---|
| १ | नागपूर | गडचिरोली, गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, वर्धा, नागपूर (एकूण सहा जिल्हे) |
| २ | अमरावती | वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, अमरावती, अकोला (एकूण पाच जिल्हे) |
| ३ | औरंगाबाद | हिंगोली, उस्मानाबाद, नांदेड, जालना, लातूर, बीड, परभणी, औरंगाबाद (एकूण आठ जिल्हे) |
| ४ | कोकण | कोकण-१ — पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड (एकूण चार जिल्हे)<br>कोकण-२ — ठाणे , मुंबई उपनगर, मुंबई शहर (एकूण तीन जिल्हे) |
| ५ | नाशिक | नंदुरबार, धुळे, अहमदनगर ,जळगाव, नाशिक (एकूण पाच जिल्हे) |
| ६ | पुणे | सोलापूर ,सातारा, सांगली, कोल्हापूर, पुणे (एकूण पाच जिल्हे) |

## परिशिष्ट

### महसूल विभाग वाटप करण्यासाठी स्पष्टीकरणात्मक उदाहरण

(पहा मुख्य नियम ६)

| वाटप करण्यासाठी उपलब्ध असलेली संख्या ५० | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क्र. | महसुलीविभाग | नागपूर | अमरावती | औरंगाबाद | कोकण-१ | नाशिक | एकूण ५ विभाग | कोकण -२ | पुणे | एकूण २ विभाग | एकूण सर्व |
| १ | मंजूर पदांची संख्या | ७९ | ७० | ९७ | ४८ | ६७ | ३६१ | १० | ७२ | ८२ | ४४३ |
| २ | भरलेली पदे | ५५ | ४९ | ६५ | ३२ | ५८ | २५९ | ४ | ५४ | ५८ | ३१७ |
| ३ | नागपूर, अमरावती व औरंगाबाद विभागात मंजूर पदांच्या ८० टक्के पदे | ६३ | ५६ | ७८ | .. | .. | १९७ | .. | .. | ० | १९७ |
| ४ | मुख्य नियम ७ मध्ये नमूद प्रकरणातील अधिकाऱ्यांनी दिलेल्या पसंतीनुसार वाटप केलेल्या पदांची संख्या [(मुख्य नियम ६ (अ) (२)] | २ | २ | १ | १ | ० | ६ | १ | १ | २ | ८ |
| ५ | उपरोक्त ४ नुसार वाटप केल्यानंतर एकूण भरलेली पदे (२+४) | ५७ | ५१ | ६६ | ३३ | ५८ | २६५ | ५ | ५५ | ६० | ३२५ |
| ६ | नागपूर, अमरावती, औरंगाबाद या महसुली विभागातील मंजूर पदांच्या ८० टक्के पदे भरण्यासाठी आवश्यक पदांची संख्या (३-५) [मुख्य नियम ६ (अ)(३)] | ६ | ५ | १२ | .. | .. | २३ | ० | ० | ० | २३ |
| ७ | नागपूर, अमरावती, औरंगाबाद या तीन महसुली विभागातील ८० टक्के पदे भरल्यानंतर वाटपासाठी उपलब्ध पदे =५०-८-२३=१९ [नियम ६ (अ)(४) (i)] | | | | | | | | | | |
| ८ | उपरोक्त १९ पदांच्या ८० टक्के नागपूर, अमरावती, औरंगाबाद, कोकण १ व नाशिक या महसुली विभागासाठी वाटपासाठी सुनिश्चित करणे (१९ × ८०%= १५) व २० टक्के पदे कोकण २ व पुणे या महसूली विभागासाठी (१९ ×२०%=३.८ =४ वाटपासाठी सुनिश्चित करणे [मुख्य नियम ६ (अ)(४) (ii)] | १५ पदे | | | | | | ४ पदे | | | १९ |
| ९. | वरील ४ व ६ प्रमाणे वाटप केल्यानंतर महसुली विभागात असलेली रिक्त पदे [(१-(५+६)] | १६ | १४ | १९ | १५ | ९ | ७३ | ५ | १७ | २२ | ९५ |
| १० | वाटपासाठी उपलब्ध उर्वरित पदांचे विभागनिहाय प्रमाणात (Proportionate) वाटप [मुख्य नियम ६ (अ)(४) (ii)] | ३ | ३ | ४ | ३ | २ | १५ | १ | ३ | ४ | १९ |
| ११ | महसुल विभाग वाटपासाठी एकूण उपलब्ध पदे (६+१०) | ९ | ८ | १६ | ३ | २ | ३८ | १ | ३ | ४ | ४२ |
| १२ | अधिकाऱ्यांनी दिलेल्या पसंतीनुसार महसुल विभाग वाटप करणे. [मुख्य नियम ६ (अ) (५)] | | | | | | | | | | |
| १३ | पसंतीनुसार विभाग वाटप केल्यानंतर, गुणवत्ता यादीतील क्रमानुसार चक्राकार पद्धतीने, विभागनिहाय पदांचे वाटप (११-१२) [मुख्य नियम ६ (अ)(६)] | | | | | | | | | | |
| १४ | उपरोक्त कार्यपद्धतीनुसार वाटप केल्यानंतर विभाग निहाय एकूण भरलेली पदे (५+११) | | | | | | | | | | |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मुकेश खुल्लर,**

शासनाचे अपर मुख्य सचिव (सेवा).